नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ५९ Issue - 59 | वार बुधवार दि. १६ जुलै २०२५ Blow- Wednesday Date 16 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# शुभांशू शुक्लांसह चौघांचे २० दिवसानंतर पृथ्वीवर आगमन

## कॅप्टन शुभांशू स्वागतम्, आम्हाला आपला अभिमान : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : शुभांशू शुक्ला १८ दिवस अंतराळात राहिल्यानंतर इतर चार अंतराळवीरांसह एक्सिओम-४ मोहिमेअंतर्गत पृथ्वीवर परतत आहेत. नासा आणि स्पेसएक्सच्या या संयुक्त मोहिमेत चार देशांच्या अंतराळवीरांचा समावेश होता.

भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला चार अंतराळवीरांसह आपली मोहीम पूर्ण करून आज पृथ्वीवर परतले आहेत.

आयएसएसवर प्रथमच भारताचा झेंडा फडकवून भारतीयांचा मान उंचावणाऱ्या अंतराळ वीर शुभांशू शुक्ला यांच्या आगमनाचा १४० कोटींहून अधिक भारतीय आनंद साजरा करत आहे. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर १८ दिवस राहिल्यानंतर आणि अनेक वैज्ञानिक प्रयोग केल्यानंतर गगनयात्री शुभांशू एक्सिओम-४ मोहिमेतील आपल्या तीन सहकारी अंतराळवीरांसह परतले आहेत. शुंभाशूंची ही मोहीमही खूप खास आहे कारण १९८४ नंतर अंतराळात जाणारे ते भारताचे दुसरे अंतराळवीर आहेत. ४१ वर्षांपूर्वी राकेश शर्मा यांनी १९८४ मध्ये सोव्हिएत युनियनच्या अंतराळयानासह अंतराळात प्रवास केला होता. शुभाशूच्या या मोहिमेनंतर भारत भविष्यात व्यावसायिक अंतराळ स्थानक उभारू शकतो. यासोबतच अंतराळात नव्या तंत्रज्ञानाची चाचणी आणि विकासही केला जाऊ शकतो. या मोहिमेमुळे २०२७ मध्ये मानवी अंतराळयान प्रक्षेपित करण्यात मदत होणार आहे. शुभांशू भारतीय हवाई दलात स्काड्रन कमांडर आहे. २००० तासांहून अधिक उड्डाणाचा अनुभव. शुभांशूंनी आपल्या अंतराळ प्रवासादरम्यान ६० हून अधिक प्रयोगांमध्ये भाग घेतला आहे, ज्यात भारतातील ७ प्रयोगांचा समावेश आहे. शुभांशू यांनी अंतराळात मेथी आणि मूगाचे दाणे पिकवले आहेत. नुकतेच त्याचे फोटोही समोर आले होते. 'या' मोहिमेसाठी 'इस्त्रो'ने सुमारे ५५० कोटी रुपये खर्च केले आहेत. २०२७ मध्ये प्रक्षेपित होणाऱ्या 'इस्त्रो'च्या मानवी अंतराळ उड्डाण कार्यक्रम गगनयानसाठी ही मोहीम महत्त्वाची ठऱणार आहे. त्या मोहिमेच्या तयारीसाठी शुक्ला यांचा अनुभव अत्यंत उपयुक्त ठरेल. अंतराळातून परतल्यानंतर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी शुक्ला आणि त्यांच्या टीमला सात दिवस पुनर्वसन प्रक्रियेतून जावे लागणार आहे. वजनविरहित वातावरणात राहिल्यानंतर शरीर पूर्वपदावर आणणे आवश्यक आहे. ही संपूर्ण प्रक्रिया शास्त्रज्ञांच्या देखरेखीखाली केली जाणार आहे.

### कॅप्टन शुभांशू स्वागतम्, आम्हाला आपला अभिमान

**मुंबई : स्वागतम् कॅप्टन शुभांशू , आपण तमाम भारतीयांचे अभिमान ठरला आहात. या यशस्वी मोहिमेसाठी आपले आणि आपल्या सहकाऱ्यांचे अभिनंदन..! अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांचे आज पृथ्वीवरील आगमनासाठी स्वागत तसेच या या यशस्वी मोहिमेसाठी अभिनंदन केले आहे. आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात पोहोचलेले पहिले भारतीय अंतराळवीर कॅप्टन शुभांशू शुक्ला आणि त्यांचे सहकारी 'क्सिओम-४' ही अंतराळ मोहीम यशस्वी करून पृथ्वीवर परतले. या यशस्वी मोहिमेमुळे भारतीयांचा अवकाश संशोधन क्षेत्रातील आत्मविश्वास दुणावला आहे. भारतीय तरुणांसाठी ही मोहीम प्रेरणादायी ठरणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दृष्टीक्षेपातील अवकाश संशोधन क्षेत्राच्या विकासासाठी टाकले गेलेले हे महत्त्वाचे पाऊल तमाम भारतीयांसाठी अभिमानास्पद आहे. त्यासाठी कॅप्टन शुभांशू यांचे आणि त्यांच्या या साहसाला पाठबळ देणाऱ्यांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचेही मनापासून अभिनंदन, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी शुभेच्छा संदेशात म्हटले आहे.**



# शाईफेक विरोधात १८ जुलै रोजी अक्कलकोट बंदची हाक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर रविवारी शाईफेक करण्यात आली होती. यानंतर मराठा समाज आक्रमक झाला आहे. आज सोलापुरात मराठी समाजाची बैठक पार पडली. या बैठकीत प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या शाईफेक विरोधात १८ जुलै रोजी अक्कलकोट बंदची हाक देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सोलापूरच्या शासकीय विश्रामगृह झालेल्या मराठा समाजाच्या बैठकीत सर्वांच्या एकमताने हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच फरार आरोपींना तात्काळ अटक करा, सर्व आरोपींना मोक्का अंतर्गत कारवाई करा अशी मागणी देखील करण्यात आली आहे.

सोलापुरातील विश्रामगृह येथे झालेल्या मराठा समाजाच्या बैठकीतनंतर महत्वाच्या समन्वयांनी प्रसारमाध्यांशी संवाद साधला. यावेळी आरोपींना मोक्का अंतर्गत कारवाई करा अशी मागणी देखील करण्यात आली आहे. अमोल राजे भोसले यांच्या संदर्भात एका कार्यकर्त्याला गैरसमज झाला होता. गैरसमजुतीतून गोंधळ उडाला मात्र नंतर बैठक सुरळीत पार पडली अशी माहिती मराठा समाज समन्वयकांची बैठकीनंतर दिली आहे. अक्कलकोट बंदच्या संदर्भाने नियोजन करण्यासाठी उद्या अक्कलकोटमध्ये नियोजन बैठक होणार आहे. अक्कलकोट बंदमध्ये जन्मजेयराजे भोसले हे देखील सहभागी होतील, असी माहिती मराठा समाज समन्वयकांनी बैठकीनंतर दिली आहे.

प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या शाईफेकनंतर मराठा समाजाची पुढची भूमिका ठरवण्यासाठी मराठा समाजाची बैठक आयोजीत केली होती. सोलापूरच्या शासकीय विश्रामगृह सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील मराठा समन्वयक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने आले होते. यामध्ये अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक जन्मजेयराजे भोसले हे देखील आपल्या समर्थकासह उपस्थित होते. या बैठकीत पंढरपूरहून आलेल्या ॲड. रोहित फावडे या तरुणाने मनोगत व्यक्त करताना अन्नछत्र (पान २ वर...)

# शशिकांत शिंदे राष्ट्रवादीचे नवे प्रदेशाध्यक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राच्या राजकारणातील मोठी बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी नव्या नेत्याची नियुक्ती करण्यात आली आहे. सध्याचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राजीनामा दिल्याची चर्चा होती. जयंत पाटील यांनी राजीनामा दिल्याचं वृत्त फेटाळलं होतं. यानंतर आज ज्येष्ठ नेते डहरीरव झरुरी यांनी पक्षाच्या नेत्यांची अतिशय महत्त्वाची बैठक बोलावली होती. या बैठकीत अखेर प्रदेशाध्यक्ष पदाबाबत मोठा निर्णय घेण्यात आला. शशिकांत शिंदे यांची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शशिकांत शिंदे यांचं नाव प्रदेशाध्यक्षपदाच्या शर्यतीत होतं. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या नावाची चर्चा होती. अखेर ही चर्चा खरी ठरली आहे.



जयंत पाटील गेल्या ७ वर्षांपासून प्रदेशाध्यक्ष होते. २०१८ साली पक्षाच्या प्रगतीच्या काळात अध्यक्ष शरद पवार यांच्या आग्रहाखातर जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी स्वीकारली होती. जयंत पाटील यांनी पदभार हाती घेताच सर्वात आधी महाराष्ट्राचा दौरा केला होता. राज्यभरात पक्षाची परिस्थिती काय आहे याची माहिती घेतली होती. विविध कार्यक्रम देऊन संघटनेला कार्यरत ठेवण्याचे काम या कालखंडात केले. जयंत पाटील यांची प्रदेशाध्यक्षपदाचा कार्यकाळ संपल्यानंतरही पक्षाकडून त्यांचा कार्यकाळ वाढवण्यात आला होता. यानंतर आता अखेर पक्षाकडून प्रदेशाध्यपदी नव्या चेहऱ्याला संधी देण्यात आली आहे.

शशिकांत शिंदे हे नेहमीच शरद पवार यांच्या जवळचे नेते मानले जात होते. शशिकांत शिंदे यांना अनेक वर्षांपासूनचा राजकीय आणि सामाजिक क्षेत्राचा अनुभव आहे. ते अनेक वर्षांपासून राजकारणात कार्यरत आहेत. त्यांचा अनुभव पाहता पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी ते योग्य ठरतील, अशी पक्षातील ज्येष्ठ नेत्यांची भूमिका होती. याशिवाय शरद पवार यांच्यासोबतची त्यांची एकनिष्ठता देखील महत्त्वाची मानली जाते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली. एका गटाने सत्ताधारी पक्षासोबत युती केली. पण शशिकांत शिंदे यांनी सत्ताधारी पक्षात न जाता शरद पवार यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभं राहणं पसंत केलं. यानंतर आता त्यांना पक्षाने मोठी जबाबदारी दिली आहे.

शशिकांत शिंदे यांची माथाडी कामगारांचे प्रभावी नेते म्हणून ओळख आहे. त्यांनी १९९९ मध्ये पहिल्यांदा जावळी मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढवली होती. त्यावेळी त्यांचा १२ हजार मतांनी विजय झाला होता. तसेच ते २००९ ते २०१४ या काळात कोरेगाव मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार होते. त्यांनी चक्क शालिनीताई पाटील यांचा पराभव केला होता. ते कोरेगाव सह जावळी मतदारसंघाचे प्रत्येकी दोन वेळा आमदार राहिले आहेत. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीवेळी त्यांनी खासदार उदयनराजे भोसले यांच्याविरोधात निवडणूक लढवली होती. ही निवडणूक अत्यंत अटीतटीची ठरली होती. पण या निवडणुकीत त्यांचा निसटता पराभव झाला होता. त्यानंतर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत कोरेगावमध्ये देखील महेश शिंदे यांच्याकडून त्यांचा पराभव झाला होता. शशिकांत शिंदे हे सध्या शरद पवार यांच्या पक्षाचे विधान परिषदेचे आमदार आहेत. तसेच ते पक्षाचे मुख्य प्रतोद देखील आहेत.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ऐतिहासिक करार**

**३१,९५५ कोटींची गुंतवणूक, एकूण ६,४५० मेगावॅट क्षमतेची वीजनिर्मिती आणि १५,००० रोजगार संधी**

# उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी जलसंपदा विभागाचे चार सामंजस्य करार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राच्या उदंचन जलविद्युत प्रकल्प (पंप स्टोरेज) क्षेत्राला नवे बळ देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली जलसंपदा विभागाने उदंचन जलविद्युत प्रकल्पांसंदर्भात महत्त्वाचे चार सामंजस्य करार केले. या सामंजस्य करारामुळे नवीकरणीय ऊर्जा निर्मितीसह औद्योगिक व सामाजिक विकासालाही मोठी चालना मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य हे पंप स्टोरेज प्रकल्पात देशात अग्रणी राज्य ठरले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

विधानभवन येथील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री (विदर्भ, तापी व कोकण विकास महामंडळ) गिरीश महाजन, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राने पंप स्टोरेज धोरणामध्ये खूप गतिशील धोरण स्वीकारले असून, प्रकल्पांची संख्या, गुंतवणूक आणि प्रस्तावित वीजनिर्मितीच्या बाबतीत संपूर्ण देशात आघाडी घेतली असून, नवीकरणीय उर्जेकडे वाटचाल करत आहोत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताला 'नेट-झिरो' देश बनवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यादृष्टीने महाराष्ट्राची वाटचाल सुरू आहे. यासाठी आम्ही २०३० पर्यंत ५० टक्केपेक्षा अधिक वीज नवीकरणीय स्त्रोतांमधून मिळवण्याचा निर्णय घेतला आहे. सौरऊर्जा आणि पंप स्टोरेजद्वारे वीजनिर्मितीवर भर देण्यात येत असून, ग्रीडची स्थिरता राखण्यासाठी पंप स्टोरेज




ही प्रणाली उपयुक्त ठरणार असून महाराष्ट्रात सौरऊर्जेमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक सुरू झाली आहे. त्याशिवाय इतर पर्यायी वीजनिर्मितीच्या क्षेत्रातही काम सुरू आहे.

गुजरात आणि राजस्थान या राज्यांमध्ये भौगोलिक परिस्थितीमुळे एक लाख मेगावॅट सौरऊर्जेची निर्मिती शक्य आहे. महाराष्ट्रात मात्र भौगोलिक मर्यादेमुळे ३० ते ५० हजार मेगावॅट इतकीच सौरऊर्जा निर्माण शक्य आहे. जैवविविधतेमुळे आणि महाराष्ट्राला लाभलेल्या सह्याद्री पर्वतरांगांमुळे पंप स्टोरेज क्षेत्रामध्ये प्रचंड क्षमता असून या क्षमतेचा उपयोग करून घेतला जात आहे. जलसंपदा विभागाने एक लाख मेगावॅट क्षमतेच्या पंप स्टोरेज प्रकल्पांचे दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवले असून, विविध उद्योगसमूहांकडून मिळणारा प्रतिसाद पाहता हे उद्दिष्ट साध्य होण्याची शक्यता असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**चार कंपन्यांबरोबर सामंजस्य करार** : राज्य शासनाने २० डिसेंबर २०२३ रोजी सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्वावर उदंचन जलविद्युत प्रकल्पांची उभारणी करण्याचे धोरण जाहीर केले होते. याच धोरणाच्या अनुषंगाने चार कंपन्याबरोबर सामंजस्य करार करण्यात आले.

**ग्रीनको एमएच- ०१ आयआरईपी प्रा. लिमिटेड –**

नयागाव ऑफ स्ट्रीम क्लोजलूप उदंचन जलविद्युत प्रकल्प, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर – स्थापित क्षमता (मे.वॅ) – २,०००

गुंतवणूक (रु.कोटी) – ९,६००

रोजगार निर्मिती – ६,०००

**ऋत्विक कोल्हापूर पीएसपी प्रा. लिमिटेड –**

ऑफस्ट्रिम क्लोजलूप उदंचन जलविद्युत प्रकल्प, ता. चांदगड, जि. कोल्हापूर

स्थापित क्षमता (मे.वॅ) – १,२००

गुंतवणूक (रु.कोटी) – ७,४०५

रोजगार निर्मिती – २,६००

**३. अदानी हायड्रो एनर्जी टेन लिमिटेड –**

अडनदी उदंचन जलविद्युत प्रकल्प, ता. चिखलदरा, जि. अमरावती

स्थापित क्षमता (मे.वॅ) – १,५००

गुंतवणूक (रु.कोटी) – ८,२५०

रोजगार निर्मिती – ४,८००

**४. मे. वॉटरफ्रंट कन्सट्रक्शन प्रा. लिमिटेड –**

कासारी- मुचकुंदी उदंचन जलविद्युत प्रकल्प, ता. लांजा, जि. रत्नागिरी

स्थापित क्षमता (मे.वॅ) – १,७५०

गुंतवणूक (रु.कोटी) – ६,७००

रोजगार निर्मिती – १,६००

एकूण – स्थापित क्षमता (मे.वॅ) – ६,४५०

गुंतवणूक (रु.कोटी) – ३१,९५५

रोजगार निर्मिती – १५,०००

या प्रकल्पांद्वारे एकूण ६,४५० मेगावॅट क्षमतेची वीजनिर्मिती अपेक्षित असून, सुमारे ३१,९५५ कोटी रुपयांची गुंतवणूक आणि १५,००० रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

**धोरणातील महत्त्वाच्या तरतुदी**

जलाशयाचा वापर केल्यास ११.३३ लाख रुपये प्रति मे.वॅ. प्रतिवर्ष भाडे

औद्योगिक दरानुसार पाणी शुल्क आकारणी

जागेचे वार्षिक भाडे प्रचलित दरांनुसार

यापूर्वी राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाने १६ विविध अभिकरणांसोबत ४६ प्रकल्पांसाठी करार केले आहेत. आजच्या करारानंतर एकूण ५० प्रकल्प झाले असून त्यातून ६८,८१५ मे.वॅ. वीज निर्मिती, ३.७५ लाख कोटींची गुंतवणूक, आणि १.११ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

पाणी वापर व महसूल

प्रथम पाणीसाठ्याकरिता : १९.२९ टीएमसी पाणी लागणार

पुनर्भरणासाठी : दरवर्षी ३.२४ टीएमसी पाण्याची गरज

महसूल उत्पन्न :

प्रथम भरावासाठी अंदाजे १७६२.२१ कोटी रुपये

वार्षिक पुनर्भरणासाठी ११२८.३२ कोटी रुपये

## संपादकीय....

### भाकरी फिरवली

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी नव्या नेत्याची नियुक्ती करण्यात आली आहे. सध्याचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राजीनामा दिल्याची चर्चा होती. जयंत पाटील यांनी राजीनामा दिल्याचं वृत्त फेटाळलं होतं. यानंतर आज ज्येष्ठ नेते ड्हरीरव झुरुरी यांनी पक्षाच्या नेत्यांची अतिशय महत्त्वाची बैठक बोलावली होती. या बैठकीत अखेर प्रदेशाध्यक्ष पदाबाबत मोठा निर्णय घेण्यात आला. शशिकांत शिंदे यांची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शशिकांत शिंदे यांचं नाव प्रदेशाध्यक्षपदाच्या शर्यतीत होतं. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या नावाची चर्चा होती. अखेर ही चर्चा खरी ठरली आहे. जयंत पाटील गेल्या ७ वर्षांपासून प्रदेशाध्यक्ष होते. २०१८ साली पक्षाच्या प्रगतीच्या काळात अध्यक्ष शरद पवार यांच्या आग्रहाखातर जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी स्वीकारली होती. जयंत पाटील यांनी पदभार हाती घेताच सर्वात आधी महाराष्ट्राचा दौरा केला होता. राज्यभरात पक्षाची परिस्थिती काय आहे याची माहिती घेतली होती. विविध कार्यक्रम देऊन संघटनेला कार्यरत ठेवण्याचे काम या कालखंडात केले. जयंत पाटील यांची प्रदेशाध्यक्षपदाचा कार्यकाळ संपल्यानंतरही पक्षाकडून त्यांचा कार्यकाळ वाढवण्यात आला होता. यानंतर आता अखेर पक्षाकडून प्रदेशाध्यपदी नव्या चेहऱ्याला संधी देण्यात आली आहे. शशिकांत शिंदे हे नेहमीच शरद पवार यांच्या जवळचे नेते मानले जात होते. शशिकांत शिंदे यांना अनेक वर्षांपासूनचा राजकीय आणि सामाजिक क्षेत्राचा अनुभव आहे. ते अनेक वर्षांपासून राजकारणात कार्यरत आ-हेत. त्यांचा अनुभव पाहता पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी ते योग्य ठरतील, अशी पक्षातील ज्येष्ठ नेत्यांची भूमिका होती. याशिवाय शरद पवार यांच्यासोबतची त्यांची एकनिष्ठता देखील महत्त्वाची मानली जाते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडली. एका गटाने सत्ताधारी पक्षासोबत युती केली. पण शशिकांत शिंदे यांनी सत्ताधारी पक्षात न जाता शरद पवार यांच्या पाठीम ागे खंबीरपणे उभं राहणं पसंत केलं. यानंतर आता त्यांना पक्षाने मोठी जबाबदारी दिली आहे.

## शाईफेक विरोधात १८ जुलै रोजी अक्कलकोट बंदची हाक

(पान १ वरून..) मंडळाचे संस्थापक जन्मजेयराजे भोसले यांचा ऐकरी उल्लेख केला होता. यावेळी अ‍ॅड. रोहित फावडे याने प्रवीण गायकवाड यांच्यावर हल्ला करणाऱ्या दीपक काटे याच्या कानात अमोलराजे भोसले काय म्हणाले? असा आरोप केला होता. याच ऐकरी उल्लेख आणि आरोपनंतर जन्मजेयराजे भोसले आणि अमोलराजे भोसले यांचे समर्थक प्रचंड आक्रमक झाले होते.

आक्रमक समर्थक अ‍ॅड. रोहित फावडे याच्या अंगावर धा-वून गेले. यावेळी फावडेला प्रचंड मारहाण करण्यात आली आहे. यावेळी बैठकीत प्रचंड गोंधळ उडाला आणि बैठकीत उप-स्थित समन्वयकांनी सर्वांना शांत करण्याचा प्रयत्न केला. काहीच वेळात बैठकीच्या ठिकाणी पो-लीस दाखल झालेय यानंतर अ‍ॅड. रोहित फावडे याला पोलिसांनी आधी बाहेर काढलं. त्यानंतर जन्मजेयराजे भोसले आणि त्यांचे समर्थक बैठकीच्या ठिकाणाहून निघून गेले आहेत. पोलिसांच्या सुरक्षेमध्ये मराठा समाजाची बैठक पुन्हा एकदा सुरु झाली आहे.

# ‘युनेस्को’च्या व्यासपीठावर १२ पराक्रम स्थळे





महाराष्ट्र हा केवळ सह्याद्रीच्या कड्याकपारींनी नटलेला प्रदेश नाही, तर तो इतिहासाचा, पराक्रमाचा आणि स्वराज्याच्या महान संकल्पनेचा साक्षीदार आहे. छत्रपती शिवाजी म हाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली गड-किल्ल्यांची शृंखला आजही त्यांच्या शौर्याच्या कथा सांगत उभी आहे. अशा १२ ऐतिहासिक किल्ल्यांना युनेस्को या जागतिक संस्थेच्या जागतिक वारस-ास्थळ मानांकनाची शिफारस झाल्याने महाराष्ट्राच्या गौरवात भर पडली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. सोबतच सामान्य जनतेने देखील गड-किल्ल्यांवर जाऊन आपला आनंद व्यक्त केला. आपला इतिहास प्रत्येकाला माहिती असणे आवश्यक असतेच. या शिवाय इतिहासातून लढण्याची प्रेरणा मिळते. भविष्याची रणनीती ठरवण्याची दिशा मिळते. येणाऱ्या पिढ्यांना आपल्या पुर्वजांसह जुनी संस्कृती अभ्यासाता येते. त्यामुळे ऐतिहासिक दुर्ग आपले कायम प्रेरणास्त्रोत आहेत. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात निम र्ाण झालेले हे दुर्ग महाराष्ट्राच्या सर्वसाम ान्यांच्या नेतृत्वाच्या दूरदृष्टीची साक्ष देणारे ठरते. सोबतच अल्प आयुष्यात सुद्धा जबरदस्त इच्छाशक्ती असेल तर तुम्ही भीम पराक्रम जगापुढे ठेवू शकता. हजारो वर्ष येणाऱ्या पिढ्यांना मार्गदर्शन करू शकता असा वस्तूपाठ छत्रपती शिवरायांच्या या १२ किल्ल्यांनी महाराष्ट्राला, देशाला दिला होता. आता हा दूरदृष्टीचा वारसा यानिमित्ताने जागतिक झाला आहे.

युनेस्को ; कार्य आणि भूमिका

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शिक्षण, विज्ञान आणि संस्कृतीच्या माध्यमातून शांतता व सहकार्य वाढविण्याच्या उद्देशाने युनेस्को (णपळींशव छरींळेपी एर्वीलरींळेपरश्र, डलळशपींळषळल रपव र्उीश्रींीीरश्र जी-सरपळूरींळेप) या संस्थेची स्थापना १६ नोव्हेंबर १९४५ रोजी पॅरिस (फ्रान्स) येथे झाली. युनेस्कोचा उद्देश म्हणजे जगातील सांस्कृतिक आणि नैसर्गिक दृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांचे जतन करणे, जपणे आणि जागतिक समुदायात त्यांची ओळख निर्माण करणे. यासाठी थेींश्रव क्शीळींरसश उेपींशपींळेप, १९७२ तयार करण्यात आले.

भारताने १९७७ साली युनेस्कोच्या जागतिक वारसा करारावर स्वाक्षरी केली. तेव्हापासून अनेक स्थळांना या यादीत मान्यता मिळाली आहे. सध्या भारतात जवळपास ४२ जागतिक वारसा स्थळे आहेत (२७ सांस्कृतिक, ७ नैसर्गिक, १ मिश्र स्वरूपाची व इतर प्रस्तावित). यामध्ये राजस्थानच्या गडकिल्ल्यांचाही सहभाग होता. महाराष्ट्राचे गड किल्ले मात्र दुर्लक्षित होते. यानिमित्ताने त्याकडे जागतिक लक्ष वेधले गेले आहे. भार-तातील स्थळांची शिफारस केंद्र सरकार अंतर्गत भारतीय पुरातत्व विभाग करतो. राज्य सरकार, स्थानिक संस्था आणि तज्ज्ञांच्या मदतीने केंद्र सरकार युनेस्कोला प्रस्ताव सादर करते.

पराक्रमाच्या १२ यशोगाथा

महाराष्ट्रातील ११ किल्ले आणि तामि ळनाडूमधील जिंजी किल्ला अशा एकूण १२ किल्ल्यांना युनेस्को जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यासाठी नामनिर्दे शन देण्यात आले आहे. हे सर्व किल्ले छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम ाचे जिवंत प्रतीक आहेत. स्वराज्याच्या राजधानीचा किल्ला रायगड, शिवाजी महाराजांचा सर्वात प्रिय किल्ला राजगड, अफझलखानाचा वध ज्या ठिकाणी झाला तो प्रतापगड, महाराजांच्या पराक्रम ाचा साक्षीदार पन्हाळा, महाराजांचे जन्मस्थान शिवनेरी, भक्कम डोंगररांगेवर वसलेला आणि लष्करी दृष्टिकोनातून महत्त्वाचा लोहगड, मराठ्यांनी पहिला मोठा विजय मिळवलेला किल्ला साल्हेर, सागरी संरक्षणासाठी बांधलेला दुर्ग सिंधुदुर्ग, सागरी दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा सुवर्णदुर्ग, सागरी लढायांचे केंद्र विजयदुर्ग आणि मुंबई किनाऱ्याजवळील सागरी संरक्षणकवच असलेला खांदेरी किल्ला. तर तामिळनाडू राज्यातील दक्षिणेकडील रणभूमीवर मराठ्यांनी ताबा मिळवलेला जिंजी किल्ल्याचा यात समावेश आहे.

तत्कालिन युद्धनीतीचे शिलालेख

महाराष्ट्रातील हे बारा किल्ले आपल्या शेकडो युद्धनीतीच्या प्रात्यक्षिकांसह उभे आहेत. हे वास्तुकलेचे प्रत्यक्ष दर्शन असले तरी जगाला आपल्या दगडांच्या कवितेतून तत्कालीन युद्धनीतीला सांगणारे उत्तम प्रतीचे जणू शिलालेख ही आहे.थोडक्यात, प्रत्येक किल्ल्याकडे आपली एक गाथा आहे.जगाला नवल वाटेल अशी रोचक प्रत्येकाची कथा आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील हे किल्ले राजकीय, लष्करी आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून अनमोल आहेत. प्रत्येक किल्ल्याचे वैशिष्ट्य स्वयंपूर्ण असून जागतिक पर्यटकांना देखील तत्कालीन युद्धनीतीची माहिती देणारे आहे. सह्याद्रीच्या कठीण डोंगररांगांवर आणि किनाऱ्यावर ही किल्ले बांधण्यात आली, ज्यामुळे शत्रूंपासून संरक्षण अधिक प्रभावी झाले. मराठा स्थापत्यकलेतील ‘माची’ एक वैशिष्ट्य असते. किल्ल्याच्या टोकाला किंवा बाहेरील भागात अस-लेले बुरुजयुक्त संरक्षण. अशा माच्या जगातील इतर कुठल्याही किल्ल्यांमध्ये दिसत नाहीत.

शत्रूला सहज लक्षात न येणारे वळ-णदार, सुरक्षित दरवाजे ही एक विलक्षण प्रवेशद्वारांची रचना आहे. ‘गनिमी कावा’ अर्थात ‘गुरीला’ युद्धनीतीमध्ये अशी रचना किती आवश्यक असते याचेही महत्त्व या रचनेवरून कळते. हे किल्ले केवळ लढायांचे ठिकाण नव्हते, तर स्वराज्य संकल्पनेचा प्रचार करणारी केंद्रेही होती. युनेस्को अद्वितीय वैश्विक मूल्य या निकषावर आधारित स्थळांची निवड करते. यामध्ये ऐतिहासिक महत्त्व आणि वैभवशाली परंपरा, स्थापत्यशास्त्रातील वैशिष्ट्यपूर्ण रचना, जगात अन्यत्र न आढळणारा अद्वितीय स्वरूप, मानवतेच्या सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहासाशी असलेली नाळ, संरक्षणाची अवस्था आणि व्यवस्थापन हे पाच गुणधर्म पाहिले जातात.या निकषांवर महाराष्ट्रातील किल्ले पूर्ण उतरतात, म्हणूनच यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा देण्यासाठी युनेस्कोच्या यादीत समावेश झाला आहे.

शिवरायांचा प्रताप जगव्यापी

या मान्यतेमुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य जगासमोर अधिक प्रभावीपणे मांडता येईल. त्यांच्या युद्धन-ीतीचा जागतिक स्तरावरील युद्धांच्या युद्धनीती सोबत अभ्यास होईल. जगाच्या पटलावर एका महान योद्धाच्या पराक्रमाचे चिंतन,मंथन होईल. हे फक्त महाराष्ट्राच्याच नाही तर भारताच्या सन्म ानाचे लक्षण आहे. जागतिक पर्यटक देखील या ठिकाणी आकर्षित होतील, ऐतिहासिक पर्यटनाला चालना मिळेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही उभारी मिळेल. १२ पराक्रम स्थळांचे युनेस्कोच्या व्यासपीठावर आगमन होणे ही महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक आणि अभिमानाची घटना आहे. हे फक्त वास्तुकलांचे प्रतिनिधी नसून, स्वातंत्र्याची, धैर्याची आणि एकीची अम ूल्य प्रतीके आहेत. यामुळे शिवरायांचे विचार, त्यांचे शौर्य आणि त्यांची दूरदृष्टी नव्या पिढीपर्यंत पोहोचेल, आणि जगा-तील इतिहासात भारताचे स्वाभिमानी पान अधिक उजळून निघेल.

**प्रवीण टाके, उपसंचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**
**भ्रमणध्वनी** – ९७०२८५८७७७



# बालगृहातील अनुचित प्रकार रोखण्यासाठी शासनाचे विशेष प्रयत्न : उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : छत्रपती संभाजीनगर येथील विद्यादीप बालगृहात घडलेल्या अनुचित प्रकाराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व बालगृहांमध्ये अतिदक्षता बाळगून भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी विशेष यंत्रणा राबविण्याच्या दृष्टीने शासन कार्यरत असल्याची माहिती विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज विधानभवन येथे झालेल्या बैठकीत दिली. या बैठकीत म हिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, आमदार चित्रा वाघ, श्रीकांत भारतीय, प्रज्ञा सातव, आयुक्त नयना गुंडे, सहायुक्त रा-हुल मोरे आदींसह संबंधित अधिकारी उप-स्थित होते. उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, अनुचित प्रकार टाळण्यासाठी प्रभावी धोरण तयार करणे आवश्यक आहे. मुलीं-चा शैक्षणिक दर्जा, कौशल्यविकास आणि जीवनमूल्ये वाढवण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे. बालगृहास प्रत्यक्ष भेटी देऊन तसेच लोकप्रतिनिधी आणि विभागाम ध्ये चर्चा करून यासंदर्भात कार्यवाही करणे गरजेचे असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, छत्रपती संभाजीनगरच्या विद्यादीप बालगृहाची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. बालगृहातील मुलींच्या समस्या समजून घेण्यासाठी व उपाययोजना करण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे. राज्यातील सर्व बालगृहे नोंदणीकृत आहेत का, हे पाहण्यासाठी गुगल मॅपिं-गद्वारे सर्वेक्षण सुरू आहे. आदिवासी विकास, सामाजिक विकास आणि महिला व बालविकास या विभागांतील बालगृहांची यादी एकत्रित केली जात आहे. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच संकटात किंवा अन्य अडचणीत असलेल्या महिलांना सहाय्य व आधार देण्यासाठी महिला व बालविकास विभागामार्फत महिला सहाय्यता केंद्र, स्वाधारगृह योजना, उज्ज्वला योजना, सखी वन स्टॉप सेंटर योजना, बाल सुरक्षा योजना, किशोरी शक्ती योजना, पालकत्व योजना अशा विविध योजना राबविण्यात येत आहेत. तसेच महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक १८१ कार्यरत आहे.

### आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांच्या आखणीसाठी बैठक

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

# सहकारी संस्थांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनासह विविध उपक्रम राबवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई, : आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष २०२५ साजरे करताना विविध उपक्रम राबविले जात आहेत. हे उपक्रम राबवत असताना पर्यावरण संवर्धन आणि वृक्षारोपण यावर अधिक भर द्यावा. सर्व उपक्रम विविध सहकारी संस्थांच्या सक्रिय सहभागातून आणि मदतीने राबवावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष २०२५ निमित्त विविध कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी विधानभवन येथे राज्य शिखर परिषदेच्या आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

या बैठकीला अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, पर्यावरण व वातावरणीय बदल पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, इतर म ागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री अ‍ॅड. माणिकराव कोकाटे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे, सहकार राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, मुख्य सचिव राजेशकुमार उप-स्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सहकार, कृषी, पणन, दुग्ध व्यवसाय, अन्न, नागरी पुरवठा विभाग, ग्राम विकास विभाग, मत्स्यव्यवसाय विभाग, अपारंपारिक ऊर्जा विभाग यांनी सम न्वयातून आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमि त्त कार्यक्रमांचे काटेकोरपणे नियोजन करावे. वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती व्यापक प्रमाणात जनतेपर्यंत पोहोचवावी. आंतरराष्ट्रीय वर्षानिमित्त राबवण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमांना वृक्ष लागवडीची जोड द्यावी. सहकार पुरस्कार २०२५ साठी सहकारी संस्थांनी प्रस्ताव सादर करण्याचा दिनांक १८ जुलै वरून ३१ जुलै करण्यात यावा असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमि त्त केंद्र व राज्य शासनाचे विविध उपक्रम समन्वयाने राबविण्यात यावेत. राज्यातील सहकार क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी राज्याने सहकार क्षेत्रात केलेली प्रगती आणि दिलेल्या योगद-ानाची माहिती राज्यातील जनतेला होण्यासाठी हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात यावा. राज्यस्तरीय शिखर समितीमार्फत वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांबाबतची माहिती समितीस वेळोवेळी सादर करावी. सहकार क्षेत्रामधील आव्हाने बदलली असून या क्षेत्राचा अभ्यास करून सहकार कायद्याचे पुनर्विलोकन करणे गरजेचे आहे. सहकार कायद्यात कोणत्या तरतुदी असाव्यात याबाबत अभ्यासगट तयार करून, त्याचा अहवाल समितीसमोर सादर करावा, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर लिखित ‘गोष्ट रिझर्व्ह बँकेची’ या पुस्तकाचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त सहकार विभागामार्फत विविध उपक्रमांच्या माहितीचे सादरीकरण केले.

प्रशासक अनास्कर यांनी अहिल्यानगर शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त राबवण्यात आलेल्या कार्यक्रमांची माहिती सादर केले. मुंबई आणि नागपूर येथे सहकार दिंडीचे आयोजन करण्यात आले. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय सहकार परिषद पार पडली. आगामी कालावधी देखील विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत. सहकार ध्वज यात्रा, सहकार मॅरेथॉन तसेच या सर्व उपक्रमांना वृक्ष लागवडीची जोड देखील देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या बैठकीला अपर मुख्य सचिव वित्त ओ.पी.गुप्ता, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परद-ेशी, प्रधान सचिव (सहकार व पणन) प्रवीण दराडे, प्रधान सचिव (कृषी) विकास चंद्र रस्तोगी, प्रधान सचिव (ग्रामविकास) एकनाथ डवले, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंग, सचिव (अन्न व ना-गरी पुरवठा) विनिता सिंगल, सचिव (पशुसंवर्धन व दुग्धविकास विभाग) एन.रामास्वामी यासह सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था दीपक ता-वरे, साखर आयुक्त, पणन संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फ ेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था फेडरेशन मर्यादित प्रदेश सुहास पटवर्धन, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक प्रतिनिधी, नागरी सहकारी बँक प्रतिनिधी, सहकारी साखर कारखाना प्रतिनिधी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# चारा छावण्यांचे अनुदान लवकरात लवकर देण्याची आमदार समाधान आवताडे यांची अधिवेशनात मागणी

## आमदार आवताडे यांच्या मागणीमुळे छावणी मालकांना येत्या सात दिवसांत बिले देण्याचे आश्वासन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :मंगळवेढा तालुक्यात चालवण्यात आलेल्या छावणी मालकांना देण्यात येणारे अनुदान अद्याप अदा करण्यात आलेले नाही. तरी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असणारे छावणी अनुदान मिळेल या प्रतिक्षेत असणाऱ्या तत्कालीन छावणी चालक मालकांना हे बिल देण्यात यावे अशी मागणी पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी विधिमंडळ पावसाळी अधिवेशन दरम्यान केली आहे केली आहे.

यासंदर्भात आमदार समाधान आवताडे यांनी प्रश्न उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले, तसेच लवकरात लवकर निधी वितरित करण्याची मागणी केली. आमदार आवताडे यांच्या या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद देत राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री ना.मकरंद पाटील यांनी येत्या सात दिवसांत निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट केले आहे.

तत्कालीन दुष्काळी परिस्थितीमध्ये या छावणी चालकांनी तालुक्यात मोठ्या प्रमाणात असणारे पशुधन जगण्यासाठी स्वखर्चाने छावण्या चालवून अनेक पशुपालक शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला होता. त्यामुळे सध्या मोठ्या आर्थिक विवंचनेत सापडलेल्या या छावणी मालकांची आर्थिक बाजू लक्षात घेऊन त्यांना त्यांचे बिल तात्काळ देण्यात यावे अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी केली आहे.

> गेल्या अनेक वर्षांपासून छावणी कालावधीत खर्ची केलेले अनुदान आज ना उद्या मिळेल या आशेवर आम्ही सर्व छावणी चालक जगत आहोत. मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे यांनी आमच्या भावना लक्षात घेऊन या मागणीवर शासन दरबारी वेळोवेळी आवाज उठवला आहे. आमदार आवताडे यांच्या या संवेदनशील नेतृत्वामुळे छावणी चालकांना वेळोवेळी दिलासा प्राप्त झाला आहे.
>
> – निलेश आवताडे,
> छावणी चालक, आंधळगाव

# प्रथम वर्ष एम.टेक. प्रवेश प्रक्रियेच्या कॅप रजिस्ट्रेशनला मुदतवाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'अभियांत्रिकीच्या पदव्युत्तर पदवी असलेल्या एम.टेक.च्या प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रिया मंगळवार, दि.०१ जुलै २०२५ पासून सुरु झाली असून राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला एम.टेक. स्क्रुटीनिटी सेंटर (एस.सी. ६२२०) म्हणून मान्यताही मिळालेली आहे. ही रजिस्ट्रेशन प्रक्रिया गुरुवार, दि. ०९ जुलै २०२५ (सायं. ५.००) पर्यंत होती परंतु या कालावधीत अनेक विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी प्रमाणपत्रे मिळाली नाहीत त्यामुळे अनेक विद्यार्थी हे नोंदणी प्रक्रियेपासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शासनाकडून बुधवार, दि. १६ जुलै २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे यांनी दिली.




राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या वतीने एम.टेक. प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून सुधारित वेळापत्रकानुसार मंगळवार, दि.०१ जुलै २०२५ पासून ते बुधवार, दि. १६ जुलै २०२५ (सायं. ५.००) वाजेपर्यंत ही रजिस्ट्रेशनची प्रक्रिया चालणार आहे तसेच कागदपत्रांची पडताळणी व निश्चिती (कन्फर्मेशन) करण्यासाठी बुधवार, दि.०२ जुलै २०२५ पासून ते गुरुवार, दि.१७ जुलै २०२५ (सायं.५.००) पर्यंत मुदत दिली आहे. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा आहे त्या इच्छुक विद्यार्थ्यांनी बी.टेक. पदवीचे शिक्षण घेतलेले असावे, गेट २०२५ मध्ये नॉन झिरो स्कोर असावा किंवा एखाद्या कंपनीत कमीत कमी २ वर्षे काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. असे पात्र विद्यार्थी एम.टेक.मध्ये प्रवेश घेऊ शकतात. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली तज्ञ प्राध्यापक वर्गाच्या सहकार्याने ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याची मोफत सुविधा स्वेरीमध्ये उपलब्ध आहे. एम.टेक.च्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात अधिक माहीतीसाठी प्रवेश प्रक्रिया विभागाचे अधिष्ठाता डॉ. करण पाटील (मोबा. नंबर-९५९५९२११५४) व डॉ. सचिन खोमणे ( मोबा.नं.- ९०४९३४९४२९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

**स्वेरीमध्ये ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा**

# घरकुल लाभार्थ्यांसाठी शिवसेना युवा नेते सुनिल मांटे यांची आक्रमक भूमिका; शासनाला निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

सिंदखेडराजा तालुक्यातील सावखेड तेजन येथील शिवसेना (शिंदे गट) युवा नेते व ग्रामपंचायत सदस्य सुनिल मांटे यांनी घरकुल लाभार्थ्यांच्या अडचणींवर थेट शासन दरबारी आवाज उठवला आहे. त्यांनी पंचायत समितीमार्फत शासनाला निवेदन सादर करत घरकुलासाठी दहा ब्रास रेती व तीन लाख रुपयांचे अनुदान तातडीने देण्याची जोरदार मागणी केली आहे.



सुनिल मांटे यांनी सांगितले की, अनेक लाभार्थ्यांकडे स्वतःची बांधकामासाठी जागा नाही. त्यामुळे अशा लाभार्थ्यांना शासकीय जमिनीवर घर बांधण्यासाठी जागा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. तसेच पंचायत समिती अंतर्गत कोणत्याही लाभार्थ्यांना घरकुल हप्त्याबाबत त्रास देऊ नये यासाठी त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

त्यांनी स्पष्ट केले की, घरकुल योजनेत एकही गरजवंत लाभार्थी वंचित राहता कामा नये. सर्वांना न्याय मिळाला पाहिजे, अशा शब्दांत त्यांनी शासनाच्या अंमलबजावणी यंत्रणेला जागे केले आहे.

# निफाड पोलीस ठाण्यातील गुरु पौर्णिमेनिमित्त शिक्षकांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

गुरुपौर्णिमेच्या निमित्तान पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार व पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांचे नेतृत्वाखाली तसेच पोलीस उपनिरीक्षक. ईश्वर पाटील,... फडोळ , पीएसआय विश्वनाथ निकम, आनंद बाविस्कर, विजय गायकवाड यांचे उपस्थितीत नुकतेच निफाड पोलीस स्टेशन अंतर्गत असलेले विविध शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक यांना निफाड पोलीस स्टेशन येथे बोलावून घेऊन गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.



ते करत असलेल्या कामाविषयी,सेवेविषयी कृतज्ञता व्यक्त करून त्यांच्या हातून भविष्यातील पिढी चांगली निर्माण करण्यासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच शाळेतील अडीअडचणी समजून घेतल्यावर त्या अनुषंगाने उपाययोजना करू असे आश्वासन यावेळी दिले

यावेळी सर्व शिक्षक व गुरुजन हे अतिशय खुश झाले असून त्यांनी त्यांच्या संपूर्ण सेवा कालावधीमध्ये पोलीस ठाणे कडून असा कृतज्ञता सोहळा आमचा नशिबामध्ये पहिल्यांदा आला असल्याची भावना व्यक्त केली , आज गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने पोलीस दलाने चांगली भेट दिली असून याचा पुढील कालावधीमध्ये अधिक जोमाने आम्ही ज्ञानार्जन करू अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. हा सन्मान सोहळा निफाड परिसरात कौतुकास्पद ठरला असून निफाड पोलीस ठाण्याचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

> शिक्षक हे समाजाचा आदर्श असून एक सुसंस्कृत पिढी घडविण्याचे महत्त्वाचे काम ते करतात, समाज घडविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा असून त्यांची योगदान अमूल्य आहे.
>
> –गणेश गुरव (पोलीस निरीक्षक)

# नळदुर्ग येथील लोकशाहीर आणाभाऊ साठे यांचे चौकात १ ऑगस्टपर्यंत स्मारक उभा करून सुशोभित करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे

नळदुर्ग येथील लोकशाहीर साहित्यरत्न आणाभाऊ साठे यांच्या नावाने गेले अनेक वर्षांपासून स्मारकासाठी जागा आसुन याच चौकात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक तयार करून त्या जागेचे सुशोभीकरण करण्यात यावे अशी मागणी नळदुर्ग येथील लहुजी शक्ती सेनेच्या वतीने एका निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली .

हि जागा सिव्हिल हॉस्पिटल जवळ गोलाई येथे आसुन त्याच ठिकाणी स्मारक व्हावे आशा प्रकारची गेले अनेक वर्षांपासून मातग समाजाच्या वतीने करण्यात येत आहे . नळदुर्ग कराच्या वतीने या चौकाचे सुशोभित करण्यात यावे म्हणून अनेक वेळा लेखी, तोंडी विनंती अर्ज केला आहे व या बाबत निवेदन किंवा तोंडी माहिती तुळजापूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार मा राणाजगजितसिंह पाटील तुळजापूरचे तहसीलदार, व नळदुर्ग येथी कर्तव्यदक्ष मुख्यधिकारी यांना अनेक वेळा वेळोवेळी पत्रव्यवहार केला आसुन या विषयीचा पाठपुरावा केला आहे वरील सर्व मान्यवरांनी सहानुभूती करून जागेची मोजणी करून अंदाजपत्रक करण्याचे सुचवले आहे. तरीही न प च्या वतीने काहीही केले जात नाही म्हणून लहुजी शक्तती सेनेच्या वतीने न प ला निवेदन देऊन लवकरात लवकर स्मारक, चौकाचे सुशोभित करण करण्यात यावे अशी विनंती केली आहे..

**लहुजी शक्ती सेनेची नगर प्रशासनाला हाक**



नळदुर्ग परिसरातील अनेक नागरीक दळण वळणासाठी नळदुर्ग ला ये जा करतात याच परिसरात हजारो मातग समाज बांधव नळदुर्ग व परीसरात राहतो परंतु आमचे दैवत व भारत देश स्वतंत्र लढा व सयुक महाराष्ट्र लढा, गोवा मुक्ती लढा, पश्चिम बंगाल चा लढा दिल्ली चा लढा अशा अनेक लढाईमध्ये मोलाचे योगदान असलेले थोर देशभक्त, समाजसुधारक, साहित्य रत्न डॉ आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती दिनी अभिवादन करण्यासाठी कोणतेही स्मारक, चौक नाही म्हणून नळदुर्ग येथे अनेक वर्षापासून प्रलंबीत असलेल्या सिव्हिल हॉस्पिटल जवळील गोलाई येथील चौकात स्मारक करून सुशोभित करण करण्यात यावे. अन्यथा मातग समाज लहुजी शक्ती सेना यांच्या वतीने येत्या दि २८/०६/२०२५ रोजी उग्र स्वरूपात आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन देण्यात आले. यावेळी कार्यालयीन अधिक्षक खलील शेख यांना निवेदन देतात लहुजी शक्ती सेनेचे प्रमुख पदाधिकारी शिवाजी गायकवाड धर्मराज देडे, महादेव मोरे, धनराज गायकवाड, नारायन हजारे प्रकाश काळे, लहु देडे, प्रदिप गायकवाड बाळु देडे विजय गायकवाड ईत्यादी समाज बांधव उपस्थित होते.

**श्रीमंत मालोजीराजे तिसरे यांच्या पुढाकाराने आयोजन**

**धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम**

# गुरूपौर्णिमेनिमित्त श्री पंचायतन गणेश मंदिरात सूर्यमणी दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/कमलाकर सोनकांबळे : गुरूपौर्णिमेनिमित्त अक्कलकोटच्या जुना राजवाडा परिसरातील श्री पंचायतन गणेश मंदिरात सूर्यमणी दर्शनाचा भव्य सोहळा मोठ्या भक्तिभावाने पार पडला. अक्कलकोटचे राजेसाहेब श्रीमंत मालोजीराजे (तिसरे) संयुक्ताराजे भोसले यांच्या पुढाकाराने आयोजित हा उपक्रम यंदा सलग चौथ्या वर्षी पार पडला. या पवित्र दिवशी सूर्यमणीच्या दर्शनासाठी अक्कलकोटसह राज्यभरातून भाविक मोठ्या संख्येने येथे आले होते.

या विशेष सोहळ्याला मिरजच्या राजघराण्याचे माननीय श्रीमंत माधवराजे पटवर्धन यांची उपस्थिती लाभली. विविध मान्यवर, संतभक्त आणि स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत हा धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम अत्यंत श्रद्धेने पार पडला.

या निमित्ताने श्रीमंत मालोजीराजे भोसले यांनी 'अनुभूती' या भव्य प्रकल्पाची माहिती सर्वांसमोर मांडली. श्री अक्कलकोट राजघराणे छत्री ट्रस्टच्या माध्यमातून राबवण्यात येणारा 'अनुभूती' हा प्रकल्प अक्कलकोटच्या आध्यात्मिक, सामाजिक व भौतिक विकासासाठी एक महत्त्वाकांक्षी पाऊल ठरणार आहे





या प्रकल्पात राम तलावाच्या मध्ये श्री स्वामी समर्थांची १०८ फूट उंच भव्य मूर्ती उभारण्यात येणार आहे. या मूर्तीच्या एका बाजूला पंचकर्मा आरोग्य केंद्र, तर दुसऱ्या बाजूला फूड कोर्ट उभारले जाणार आहे. राम तलावाच्या किनाऱ्यावरच एक ॲम्फीथिएटर म्हणजे मुक्तनाट्यगृह साकारण्यात येणार आहे, जेथे सांस्कृतिक व आध्यात्मिक कार्यक्रम होणार आहेत.

या प्रकल्पात एक मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल, भक्तनिवास, सार्वजनिक बागा, तसेच 'दिव्य दर्शन' नावाची एक भुयारी गुहा प्रणाली उभारली जाईल, ज्यामध्ये श्री स्वामी समर्थांच्या जीवनातील प्रसंग चित्रमय स्वरूपात मांडले जातील. तसेच, 'कुंजरबन' नावाचा एक विशेष परिसर साकारण्यात येणार आहे, जो अक्कलकोटच्या राजघराण्याच्या हत्तींसाठी समर्पित असेल.

या सर्व उपक्रमांमुळे अक्कलकोट केवळ एक आध्यात्मिक स्थान न राहता, एक संपूर्ण सांस्कृतिक, आरोग्यविषयक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून विकसित होणार आहे.

श्रीमंत मालोजीराजें च्या दूरदृष्टीमुळे अक्कलकोटच्या भवितव्यातील एक नवा अध्याय लिहिला जात असून, 'अनुभूती' प्रकल्प हे त्या दिशेने एक भक्कम पाऊल ठरत आहे.

सूर्यमणीचे दर्शन हा अक्कलकोटच्या अध्यात्मिक परंपरेचा एक मौल्यवान भाग ठरत असून, राजघराण्याच्या सततच्या प्रयत्नांमुळे ही परंपरा अधिक व्यापक आणि भाविकांपर्यंत पोहोचणारी ठरत आहे. राजवाडा प्रांगणातील हे आयोजन स्थानिक संस्कृती, श्रद्धा आणि परंपरेचे प्रतीक बनले आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजघराणे, स्थानिक स्वयंसेवक आणि प्रशासन यांचे विशेष सहकार्य लाभले.

यावेळी उपस्थित सोलापूरचे पोलिस अधीक्षक सो मा. अतुल कुलकर्णी , पोनि महेश स्वामी, पोनि राहुल डोंगरे, ॲड सयाजी राजे भोसले,आशिष कदम, श्री शिवराज म्हेत्रे, शितल ताई म्हेत्रे,नितीन अणवेकर, ड.शुभम वडणे,कोल्हापूरचे इंद्रजीत मंडलिक,सोलापूरचे स्त्री रोग तज्ञ डॉक्टर प्रियदर्शनी कादे, ययाती साटम, ॲड. प्रतीक तावरे, जयसिंह पाटील, शक्ती टोणे, सातारचे उद्योगपती अमित जाधव,रवी महाडिक, अभिषेक शेजाळे, सौ. पूजा चौबळ, सप्तेश चौबळ, स्वप्निल गायकवाड श्रेयांशू कोठे, प्रकाश जमादार, स्वप्निल कटारे, अमोल भामरे, शुभम मोरे, अभिषेक काकडे, उत्कर्ष उकरंडे, सिद्धेश्वर साखर कारखान्याचे संचालक अशोक पाटील, तेजस दंडगव्हाळ, अतुल तेरकर, मालबा लोंढे, मंजिरी कुलकर्णी, महेश हिंडोळे, शशिकांत लिंबी तोटे, उद्योगपती श्रेयस मुनाळे, गणेश दिवाणजी, चिदानंद उपाध्ये, तम्मा शेळके, राज यादव, आरती काळे मॅडम, सिद्धार्थ बिंदगे, श्रीपाद पुजारी, मल्हारी शिंदे, शेकप्पा माने, ओंकार जाधव, श्रीकांत उपासे, पिंटू फुले,अभिजीत पवार, नागेश घोडके, रोहित हिरतोट,गावातील व्यापारी वर्ग, महाराष्ट्रातील स्वामी भक्त, सर्व पत्रकार बंधू, सर्व पोलीस बंधू, राजवाडा मधील सर्व स्टाफ व आदी मान्यवर उपस्थित होते.

# पडघ्यात पाणी नसल्यामुळे नागरिकांचे हाल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : पाण्याची मोटर व पॅनल खराब झाल्यामुळे भिवंडी तालुक्यातील पडघा ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना गेल्या पाच दिवसांपासून पाणी पुरवठा न झाल्यामुळे पडघ्यातील नागरिकांचे हाल झाले आहेत. पाण्याची गरज सर्वांनाच असून पाणी नसल्याने त्याचा फटका सर्वंच नागरिकांना होत आहे. पंधरा हजारहून अधिक लोकसख्या असलेल्या पडघा मध्ये पाणी नसल्याने

पाणी कधी येईल कधी? अशी चर्चा सुरू असून,नागरिकांचे हाल होत आहेत. सद्या सर्व नागरिक पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत. बिघाड झालेल्या पाण्याची मोटर लवकरात, लवकर बनवावी अशी मागणी पडघ्यातील नागरिकांकडून आता जोर धरू लागली आहे. जुपाडा येथे असलेल्या जाकवेळ येथे पाण्याची मोटर व पॅनल खराब झाले असून ते बनविण्याचे काम सुरूच आहे. उद्या पर्यंत काम पूर्ण होईल व पाणी पुरवठा सुरळीत होईल असे पडघा ग्रामपंचायतिचे ग्रामपंचायत अधिकारी भास्कर घूडे यांनी बोलताना सांगितले.

# मेरा बुद्रुक ते मेरा खुर्द रस्त्यावर पडली मोठ मोठे खड्डे

## लोकप्रतिनिधी सह संबंधित विभागाचे दुर्लक्ष; वाहनधारक व जनता त्रस्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

चिखली तालुक्यातील सर्वात मोठे गाव असलेले मेरा बुद्रुक या गावापासून ते मेरा बुद्रुक फाट्यापर्यंत,मेरा बुद्रुक फाटा ते मेरा खुर्द पर्यंत रोडचे अतोनात हाल झाले असून,हा रस्ता लोकांच्या जीवावर उठला असून या रस्त्यावरून जाताना वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे,मेरा बुद्रुक गाव ते मेरा बुद्रुक फाट्यापर्यंत रस्त्यावर मोठ मोठाले खड्डे पडले असून सध्या पावसाळ्याचे दिवस असताना त्या खड्ड्यांमध्ये पाणी साचून सध्या त्या खड्ड्याचे तळ्यात रूपांतर झाले आहे.वाहनधारकांना त्या खड्ड्याचा अंदाज येत नसल्यामुळे दररोज अनेक अपघात होत आहे. तर या खड्ड्यामुळे अनेकांचे अपघात होऊन कायमच अपंगत्व आल्याचे समोर आले आहे,सार्वजनिक बांधकाम विभागाचे याच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होताना दिसत आहे.तसेच मेरा बुद्रुक ते मेरा खुर्द हा रस्ता जागोजागी उखडला तरी संबंधित विभागाला लोकांचे मनके तुटत असले तरी काही सोयर सुतक दिसून येत नाही. मनुबाई, गुंजाळा मेरा बुद्रुक येथील ग्रामस्थांना तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्यासाठी हाच एकमेव रस्ता आहे. त्यामुळे महसूल, शिक्षण, दवाखाना,किंवा खरेदीसाठी जाताना याच रोडने जावे लागते. परंतु रस्ता पूर्णपणे उखडला असून,मेरा बुद्रुक ते मेरा फाटा या रस्त्यावर काही ठिकाणी मोठ मोठाले खड्डे पडून लहान-मोठे अपघात होत आहे.साखरखेर्डा - मेरा बुद्रुक - मेरा खुर्द हा रस्ता नेहमी वाहनाने गजबजलेला असतो.ह्या रोड वरून वाहनाची रहदारी ही जास्त असल्यामुळे दिवसातून अनेक वेळा या रस्त्यावर लहान मोठे अपघात होत असल्याने साखरखेर्डा,मेरा खुर्द रस्त्या रुंदीकरणाची मागणी सुद्धा सर्वसामान्य वर्गातून जोर धरत आहे.या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठ मोठाले खड्डे पडले असून,तर काही ठिकाणी रस्त्याची चाळण झाली आहे. मेरा बुद्रुक फाटा येथे चौफुली असल्याने भरधाव वेगात जाणाऱ्या वाहनामुळे एखादी मोठी जीवित हानी होऊ शकते त्यामुळे मेरा बुद्रुक (फाटा) येथे गतिरोधकाची मागणी जोर धरत आहे.मेरा बुद्रुक फाटा ते अंत्री खेडेकर रस्त्याच्या साईडला असलेले काटेरी झुडपाच्या फांद्या रस्त्यावर आल्या आहेत,त्या सुद्धा अपघाताला कारणीभूत ठरत आहे.तरी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष घालून ह्या रस्त्यावर पडलेले मोठमोठे खड्डे बुजवावे,रस्त्याच्या साईड वरील अपघाताला कारणीभूत ठरत असलेले काटेरी झुडपे तोडावी अशी मागणी मेरा बुद्रुक, गुंजाळा, मनुबाई येथील ग्रामस्थ व वाहनधारक करीत आहे.

### आमदार श्वेताताई महाले पाटील यांच्या प्रयत्नाने गाव ते फाटा रस्त्याचा प्रश्न मार्गी : निखिल पाटील

**मेरा बुद्रुक फाटा ते गाव रस्त्या संदर्भात वेळोवेळी पाठपुरावा करत असताना सन्माननीय महाले साहेब,चिखली मतदार संघाच्या आमदार श्वेताताई महाले पाटील यांनी माझ्या वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्याची दखल घेऊन मेरा बुद्रुक फाटा ते गावाकडे जाणारा ७०० मीटर रस्ता होणार असून त्यामुळे वाहनधारकांना होणारा त्रास कमी होणार आहे.**

**- निखिल पाटील (भाजपा नेते मेरा बुद्रुक)**

**मी माझ्या वाहनाचा रोड टॅक्सच्या नावाने मी लाखो रुपये भरलेले आहे,असे असताना सुद्धा ग्रामीण भागातील रस्त्याचे अतोनात हाल झालेले आहे,त्यामुळे माझ्या वाहनांमध्ये मेंटेनन्सचा खर्च वाढला आहे तर एखाद्या पेशंटला तालुक्याच्या ठिकाणी नेण्याचे काम पडले त्यावेळेस खराब रस्त्यामुळे अनेक त्रासाला सामोरे जावे लागत आहे,त्यामुळे वेळीच मेरा बुद्रुक गाव ते मेरा खुर्द पर्यंत रस्ता होणे गरजेचे आहे कारण ह्या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठ मोठाले खड्डे पडलेले त्या खड्ड्याचा अंदाज येत नसल्यामुळे वाहन चालवताना त्या खड्ड्यातून पाणी उडल्यामुळे अनेक वाहन धारकांसोबत दररोज वादविवाद होत आहे .**

**- मदन मापारी (वाहनधारक मेरा बुद्रुक)**



## थोडक्यात...

### अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून दागिने पळवले

सोलापूर (प्रतिनिधी) सुभाष नगर येथे फिर्यादी शरयू रावसाहेब पाटील (वय-८०,रा.सुभाष नगर,चौगुले वस्ती) यांच्या घराच्या उघड्या दरवाजातून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करत घरात ठेवलेले सोन्याचे मंगळसूत्र,सोन्याची बोरमाळ,सोन्याची चैन कानातील फुले असा एकूण २ लाखांचा ऐवज चोरून नेल्याची घटना १३ ऑगस्ट २०२२ रोजी घडली.याप्रकरणी शरणू पाटील यांनी तब्बल चार वर्षानंतर दि.१० जुलै २०२५ रोजी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार भिसे हे करीत आहेत.

### लहान मुलांच्या भांडणावरून फायटरने मारहाण; चौघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) लहान मुलांच्या भांडणावरून फायटरने मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हि घटना ८ जुलै रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास गौतम नगर झोपडपट्टी विजापूर रोड येथे घडली. याप्रकरणी विजया सुभाष कोरे (वय-३५,रा.गौतम नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून प्रदीप गायगवळी,नाकसेन गायगळी,आदर्श गायगवळी व आशिष गायगवळी (रा. माहित नाही) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हे कुटुंबीयांसोबत घरासमोर थांबलेले असताना लहान मुलांच्या झालेल्या भांडणाच्या कारणावरून वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी व त्यांचे पती सुभाष कोरे,भाऊ रवींद्र कांबळे व मुलगा बुद्धभूषण याला हाताने लाकडाने व तसेच फायटरने मारहाण करून जखमी केले.तसेच आमच्या नादाला लागू नका, नाहीतर जिवंत सोडणार नाही असे म्हणून शिवीगाळ करत धमकी दिली आहे.
तसेच फिर्यादी यांच्या गळ्यातील चार ग्राम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र पडून गहाळ झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हवालदार सांगळे हे करीत आहेत.


# मुंबई नाशिक महामार्गावरील पुलाला खड्डा; रस्त्याचे निकृष्ठ काम पुन्हा चव्हाट्यावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

मुंबई नाशिक महामार्गावरील खारेगाव ते वडपा रस्ता रुंदीकरणाच्या कामात प्रचंड हलगर्जीपणा होत असून कामाच्या गुणवत्तेबाबत सुरुवातीपासूनच शंका उपस्थित करण्यात येत आहे. या कामाबद्दल अनेकांनी तक्रारी केल्या असून सध्या पावसाळ्यात या नवीन रस्त्यावर ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करताना प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

मुंबई नाशिक महामार्गावर असलेल्या सोनाळे येथील उड्डाण पुलावर मला मोठा खड्डा पडला होता या खड्ड्याचा व्हिडिओ सोमवारी समाज माध्यमांवर प्रचंड व्हायरल झाल्याने रस्ता दुरुस्त करणाऱ्या ठेकेदाराने रात्रीतच हा खड्डा दुरुस्त केला आहे. खड्डा दुरुस्त केला असला तरी नव्या रस्त्यावर एवढा मोठा खड्डा पडल्याने या महामार्गाच्या कामांमध्ये होत असलेला हलगर्जीपणा व कामाचा निकृष्ट दर्जा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहे.



### इंजिनिअरिंग प्रवेशाचा शेवटचा दिवस...

# प्रांत अधिकाऱ्यांच्या तत्परतेमुळे विद्यार्थ्याच्या चेहऱ्यावर उमटले आनंदाचे हास्य!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : तांत्रिक अडथळ्यांमुळे सरकारी सेवा वेळेवर मिळत नसल्याची तक्रार अनेकदा ऐकू येते. पण, निफाड आणि दिंडोरी प्रांत कार्यालयातील काही अधिकाऱ्यांनी दाखवलेली संवेदनशीलता आणि तत्परता यामुळे एका होतकरू विद्यार्थ्याचे भविष्य उजळले.

कुणाल आवारे हा निफाड तालुक्यातील विद्यार्थ्याने इंजिनिअरिंगच्या पुढील वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली होती. मात्र, आवश्यक असलेला जात दाखला अद्याप मिळालेला नव्हता. आज म्हणजेच दि.१५ जुलै हा प्रवेशाचा अंतिम दिवस होता. मात्र निफाड प्रांत कार्यालयात काही तांत्रिक अडचणीमुळे दाखला तयार होऊ शकत नव्हता. त्यामुळे प्रवेशाचा शेवटचा दिवस हातातून निसटणार का? अशी भीती कुणाल आणि कुटुंबीयांना वाटत होती.

या परिस्थितीत निफाड प्रांत कार्यालयातील कर्मचारी संदिप मेढे यांच्याशी संपर्क साधण्यात आला, त्यांनी अर्ज मंजूर करून दाखल्यांसाठी असणारा थम हा दिंडोरी उपविभागीय कार्यालयाकडे असल्याने दिंडोरी प्रांत कार्यालयातील सावजी भाऊसाहेब यांच्याशी संपर्क साधला. सावजी भाऊसाहेब यांनी सर्व परिस्थिती दिंडोरी प्रांताधिकारी आप्पासाहेब शिंदे यांना सांगितली. दिंडोरी प्रांताधिकारी आप्पासाहेब शिंदे यांनी आवश्यक ती कार्यवाही करत तातडीने आवश्यक दाखला तयार करून विद्यार्थ्याला दिला गेला.

या प्रसंगामुळे कुणालला वेळेपूर्वी जात दाखला मिळाला आणि त्याचा प्रवेश निश्चित झाला. तणावपूर्ण क्षणांमध्ये दाखला हाती पडताच त्याच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य उमटले. ही घटना शासकीय यंत्रणेमधील संवेदनशील अधिकाऱ्यांचे उत्तम उदाहरण ठरते. वेळेच्या मर्यादेत काम करत एका विद्यार्थ्याचे आयुष्य घडवण्याचे काम या अधिकाऱ्यांनी केले. प्रांताधिकारी आप्पासाहेब शिंदे आणि सावजी भाऊसाहेब, संदिप मेढे यांची तत्परता नक्कीच शासकीय वर्तणुकीला छेद देणारी आहे. सरकारी यंत्रणा केवळ कागदोपत्री प्रक्रिया न राहता, माणुसकीच्या भावनेने चालवली गेली तर अनेकांची स्वप्ने सत्यात उतरू शकतात हे या प्रसंगातून स्पष्ट झाले आहे.

# महिलांमध्ये कर्करोगाविषयी जनजागृतीसाठी ‘संजीवनी अभियान’

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : हिंगोली जिल्ह्यातील ‘संजीवनी अभियान’ हे आरोग्यविषयक नवचैतन्य निर्माण करणारे ठरत असून कर्करोगावरील लढ्यात एक सकारात्मक पाऊल मानले जात आहे. हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या संकल्पनेतून महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च २०२५ रोजी संजीवनी अभियाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला होता. महिलांमध्ये कर्करोगाविषयी जनजागृती निर्माण करणे, तसेच कर्करोगाचे लवकर निदान व वेळेत उपचार उपलब्ध करून देणे, हा या अभियानाचा उद्देश आहे.

हिंगोली जिल्ह्यात अभियानाच्या पहिल्या टप्प्यात आशा सेविकांमार्फत घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात आले. यासाठी जिल्हास्तरावरून महिलांच्या आरोग्य समस्या व कर्करोगाची प्राथमिक लक्षणे लक्षात घेऊन विशेष प्रश्नावली तयार करण्यात आली होती. या सर्वेक्षणामध्ये गर्भाशयमुख, स्तन आणि मुख कर्करोग यासारख्या प्रमुख कर्करोग प्रकारांसाठी संशयित रुग्णांची ओळख पटविण्याकरिता सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणामध्ये कर्करोग सदृश, बुरशीजन्य, विषाणूजन्य आणि जिवाणूजन्य लक्षणे असणाऱ्या व इतर समस्या असणारे महिला व पुरुष असे एकूण १४,५४२ व्यक्ती संशयित म्हणून नोंदविण्यात आले. यात ७,९११ महिला गर्भाशयमुख कर्करोगासाठी, २,६९८ महिला स्तन कर्करोगासाठी व ३,९३३ स्त्री-पुरुष मुख कर्करोगासाठी संशयित आढळले.

पुढील टप्प्यात या संशयित रुग्णांची सखोल तपासणी करण्यात आली. गर्भाशयमुख कर्करोग संदर्भात एकूण ७,४३१ महिलांची व्हिज्युअल इन्स्पेक्शन विथ सेटिक सिड चाचणी करण्यात आली. त्यापैकी ६५९ महिलांमध्ये व्हिआयए पॉझिटिव्ह निदर्शनास आले तर ६,७७२ महिलांची व्हिआयए तपासणी अहवाल निगेटिव्ह आला असून त्यांना स्थानिक बुरशीजन्य जंतू संसर्ग झाल्यामुळे वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत औषधोपचार करण्यात आले. आजमितीस ६५९ महिला गर्भाशयमुख कर्करोग संशयित असून त्यापैकी ४२७ महिलांची गर्भाशयमुखाच्या कर्करोगासाठी तपासणी आणि ७३ महिलांची बायोप्सी तपासणी स्त्रीरोग तज्ज्ञांच्या माध्यमातून करण्यात आली आहे. या तपासण्यांमध्ये आजअखेर ४ महिलांमध्ये गर्भाशयमुख कर्करोगाचे निदान झाले आहे.

स्तन कर्करोग संदर्भात, सर्वेक्षणादरम्यान २,६९८ महिला संशयित लक्षणे असल्याच्या आढळून आल्या होत्या. त्यापैकी २,५१२ महिलांची वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत क्लिनिकल बेस्ट तपासणी (सीबीई) करण्यात आली. यामध्ये २२८ महिलांमध्ये सीबीई पॉझिटिव्ह निष्कर्ष मिळाले, उर्वरित २२८४ महिलांची सीबीई तपासणी निगेटिव्ह असून त्यांना वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत स्तनाशी निगडित इतर समस्या बाबत औषधोपचार देण्यात आले आहे. आज २२८ महिला ह्या स्तन कर्करोग संशयित असून यापैकी २२ महिलांची सूक्ष्म सुई पेशी (एफएनएसी) तपासणी करण्यात आली. यात ४ महिलांमध्ये स्तन कर्करोगाचे निदान झाले आहे. मुख कर्करोगाबाबत, ३९३३ स्त्री व पुरुष संशयित रुग्णांपैकी ३५११ व्यक्तींची तोंडाची दृश्य तपासणी करण्यात आली.

त्यामध्ये १०९ व्यक्तींमध्ये मुख कर्करोग सदृश लक्षणे दिसून आली. उर्वरित ३४०२ स्त्री व पुरुष यांना मुखाच्या इतर समस्यांबाबत दंतशल्यचिकित्सक मार्फत शमन उपचार देण्यात आले आहे. १०९ स्त्री व पुरुष हे मुख कर्करोग संशयित असून त्यापैकी १८ व्यक्तींची दंतशल्यचिकित्सकांच्या माध्यमातून बायोप्सी तपासणी करण्यात आली असून त्यामधून १२ रुग्णांमध्ये मुख कर्करोग असल्याचे निदान झाले आहे. संजीवनी अभियानार्तंर्गत आज गर्भाशयमुख कर्करोग संशयित महिलांची संख्या ६५९, स्तन कर्करोग संशयित महिलांची संख्या २२८ व मुख कर्करोग संशयित स्त्री व पुरुष यांची संख्या १०९ असे एकूण ९९६ संशयित कर्करोग स्त्री पुरुष आढळून आले आहेत. आज यात गर्भाशयमुख कर्करोग निदान झालेल्या महिलांची संख्या ४, स्तन कर्करोग निदान झालेल्या महिलांची संख्या ४ व मुख कर्करोग निदान झालेल्या स्त्री व पुरुष यांची संख्या १२ असे एकूण २० कर्करोग बाधित रुग्ण आढळून आले आहे. या रुग्णांवर उपचार प्रक्रियेचा प्रारंभ करण्यात आला आहे. ४२७ पैकी २०८ रुग्णांवरील गर्भाशयमुखाच्या कर्करोगासाठी तपासणी अहवाल प्राप्त असून यात २३ महिलांचे बायोप्सी तपासणी करणे आवश्यक आहे. त्याबाबत स्त्री रोग तज्ज्ञांमार्फत बायोप्सी घेण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे, असे हिंगोली जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी कळविले आहे.

### तहसील कर्मचारी सरकारी पदावर, पण ग्रामपंचायतीच्या कारभारावर ‘दबदबा’

### संघटनांचा आंदोलनाचा इशारा

# महिला पत्रकाराचा अपमान; अजय खिराडे यांच्यावर तातडीने कारवाई करा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाशिम : मंगरूळपीर तहसील कार्यालयातील शासकीय कर्मचारी अजय खिराडे यांच्याविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी असूनही स्थानिक प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने जनतेत संतापाची लाट उसळली आहे. पत्रकार संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी आता थेट महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदन पाठवत कठोर कारवाईची मागणी केली आहे.

सौ. सुनिता अजय खिराडे या गट ग्रामपंचायत जांबच्या सरपंच असल्या तरी प्रत्यक्ष कारभार त्यांच्या पती अजय खिराडे चालवत असल्याचा गंभीर आरोप आहे. प्रशासनाने याकडे कानाडोळा करत कारवाई टाळल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. हे केवळ अधिकारांचा गैरवापर नाही, तर शासकीय कर्मचाऱ्यांनी गावच्या कारभारात हस्तक्षेप करणे हा खुला शासकीय शिस्तभंग असल्याचे मत तज्ञांकडून व्यक्त होत आहे.

महिला पत्रकारावर अश्लील भाषेचा वापर - बैठकीतच घडला प्रकार:

पदमा मोहड या महिला पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्या यांनी गावातील नागरी सुविधांबाबत वारंवार निवेदने दिली होती. याच रागातून २७ जून रोजी ग्रामपंचायतीच्या मासिक बैठकीत त्यांच्याशी अश्लील भाषेत बोलण्यात आल्याचा आरोप अजय खिराडे व त्यांच्या पत्नीवर आहे. या प्रकाराचा व्हिडिओ पुरावादेखील उपलब्ध असूनही प्रशासनाने अद्याप कोणतीही कारवाई केली नाही.

तहसीलदार मॅडम बंडगर यांचे समर्थन?

निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, तहसीलदार शितल बंडगर यांनी तक्रारदाराची माहिती असूनही कुठलाही ठोस निर्णय न घेता संबंधित कर्मचाऱ्याला पाठीशी घातले आहे. हे संपूर्ण प्रकरण आता प्रशासनाच्या निष्क्रीयतेचे आणि पक्षपातीपणाचे जिवंत उदाहरण ठरत आहे.

या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन आंबेडकरी व्हाईस मिडीया फोरम आणि एनव्हीएमएफ या संघटनांनी आता जर कारवाई झाली नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. प्रकाश सरदार (केंद्रीय सचिव, एनव्हीएमएफ) यांनीही या प्रकरणाचा तपशीलवार पाठपुरावा सुरू केला आहे.

प्रश्न उपस्थित होतो आहे की : शासकीय कर्मचारी असलेल्या व्यक्तीला ग्रामपंचायतीच्या कारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार कोणी दिला? महिला पत्रकारावर अश्लील भाषेत बोलल्याचे व्हिडीओ पुरावे असतानाही प्रशासन मौन का बाळगते? तहसीलदारांचा पक्षपात करत एक कर्मचाऱ्याला अभय का दिले जाते? ही बाब केवळ एका पत्रकाराची नाही,







तर लोकशाही व्यवस्थेच्या विरोधात उभी ठाकलेली विकृती आहे. प्रशासनाने तत्काळ योग्य ती कार्यवाही करावी, अन्यथा रस्त्यावर संघर्ष अटळ आहे.